श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

दि.०६ नोव्हेंबर, २०२६

विषय:— सी सी टि व्ही (CCTV) यंत्रणा भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्याबाबत

दि. ०१ जानेवारी , २०२७ नुतनवर्षा निमित्त न्यासातर्फे न्यासातर्फे रांग व्यवस्थापनेसाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपामध्ये भाविकांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने सी सी टि व्ही (CCTV) यंत्रणा भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या **www.siddhivinayak.org** या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे. त्याचा मूल्य दरपत्रकाचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

दि. ०१ जानेवारी,२०२७ (नुतनवर्ष)				
अ. क्र.	तपशील	एकूण संख्या	दर रु. प्रति नग	एकूण दर (GST वगळून)
१	**IP 2MP Bullet Camera with Cable & POE switch**	३५		
२	**IP 4MP Bullet Camera with Cable & POE switch**	३५		
३	**NVR 32 CH with operator**	३		
	अ. क्र. १ + अ. क्र. २ + अ. क्र. ३ मिळून एकूण रक्कम रुपय			

अटी व शर्ती :—

१) शनिवार,दि. २१ नोव्हेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद दरपत्रकाचा लिफाफा लाखेने सिलबंद करून प्रतिक्षालयाच्या तळ मजल्यावर टपाल कार्यालयात सादर करावा. ए—४ साईजचे दोन मोठे लिफाफे (एक तांत्रिक लिफाफा व एक मूल्य लिफाफा) लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मूल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे. एका बाजूला दरपत्रकधारकाचे संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहिण्यात यावे तसेच दुसऱ्या बाजूला श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास प्रभादेवी, मुंबई, देखभाल व दुरूस्ती विभाग असे लिहावे. मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर, २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात मोहोरबंद दरपत्रकांचे लिफाफे उघडण्यात येतील

२) दरपत्रक सादर करताना दरपत्रकात (BOQ) नमूदप्रमाणे रक्कम भरावी. दरपत्रकधारकारांनी BOQ मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून मूल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी.

दरपत्रका सोबत जोडावयाची कागदपत्रे

अ) कंपनी नोंदणी दाखला (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट) किमान ३ वर्षापूर्वीचा व्यवसाय असावा.

ब) आयकर नोंदणी पॅन कार्ड

क) जी. एस. टी. नोंदणी दाखला

ड) मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र (आय. टी. आर. रिटर्नस आर्थिक वर्ष २०२२—२३, २०२३—२४, २०२४—२५)

इ) अनुभवाचा दाखला दरपत्रकधारकाकडे देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकीत कंपन्या, शासकीय,निम शासकीय, महानगर पालिका, संस्था तसेच अन्य ठिकाणी दरपत्रकात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने काम केल्याचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असावा. (कार्यादेशाची किंवा देयकाची प्रत).

३) दरपत्रकधारक हा हिंदू असावा.

४) ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास सदर बैठकीत अटी व शर्ती मध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय खरेदी उप समितीने घेतल्यास आपणास तो निर्णय मान्य करावा लागेल याबाबत कंत्राटदाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही

५) सी सी टि व्ही (CCTV) यंत्रणा कार्यान्वयीत करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ व सर्व साहित्य कंत्राटदारास आणावे लागतील. सी सी टि व्ही (CCTV) मध्ये नेमणूक करण्यात येणारे ऑपरेटर हे प्रशिक्षित असावेत व नेमणूक करण्यात येणाऱ्या ऑपरेटरची एक शिफ्ट ९ तासांची असेल.

६) काम सुरू करण्यापुर्वी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सर्व नियम व सूचनांचे पालन करणे (उदा. या कामासाठी लागणारे विविध परवाने व सुरक्षिततेचे नियम) कंत्राटदारावर बंधनकारक असेल. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

७) कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील १९२३ तरतूदीचे पालन करणे तसेच यासंबंधाने कामासाठी लावणेत येणाऱ्या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्राव्हीडंन्ट फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच वर्कमॅन कॉम्पेन्सेशन ॲक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई वगैरेबाबतच्या सर्व कायदेशीर तरतूदींचे पालन करणे याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. उक्त सर्व कायद्यातील तरतूदींचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

८) कंत्राटदारामार्फत नेमणूक करण्यात आलेले ऑपरेटर किंवा कर्मचारी कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न्यासाकडे मागता येणार नाही. कंत्राटदारास संबंधितांचा अपघात विमा/जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील.

९) कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन अथवा न्यासाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास नियमाप्रमाणे कंत्राटदाराकडून नुकसान भरपाई घेतली जाईल. कर्मचाऱ्यांकडून कोंणत्याही प्रकारचे गैरवर्तन किंवा सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर स्वरूपाची चूक झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

१०) या कामासाठी लावण्यात येणारे कर्मचारी/कामगारांचे पोलीस व्हेरिफिकेशन करून घेणे संबंधित कंत्राटदारावर बंधनकारक राहील. तसेच किमान ८ दिवस अगोदर पोलीस व्हेरिफिकेशन केल्याचे प्रमाणपत्र न्यासास सादर करणे आवश्यक राहील. त्याच आधारावर कामगारांना तात्पुरते ओळखपत्र देण्यात येईल.

११) कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या पर्यवेक्षण करणाऱ्या व्यक्तीने न्यास प्रशासनासोबत समन्वय साधणे आवश्यक राहील. कार्यादेशाप्रमाणे काम करीत असलेल्या कामाचे केव्हाही परिक्षण करण्याचा न्यासाला पूर्ण अधिकार राहील. काम सुरू असताना निष्काळजीपणामुळे कोणत्याही प्रकारच्या मंदिराच्या मालमत्तचे नुकसान झाल्यास न्यासामार्फत आपणाकडून नुकसान भरपाईची रक्कम आपल्या बिलातून वजा करण्यात येईल.

१२) दरपत्रक भरतांना मूळ दरामध्ये वाहतूक, मजुरी, हमाली व इतर सर्व प्रकारचे खर्च पकडून (GST वगळून/Excluding GST) दराची रक्कम भरावी. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल. कामासंदर्भात कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१३) ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाराने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

१४) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवलेला आहे.कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.तरी वरील सर्व अटी व शर्तीस अनुसरून आपले दरपत्रक भरण्याचे करावे शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा. श्री. जनार्दन शिरवडकर, पर्यवेक्षक – भ्रमणध्वनी क्रमांक. ९८६७७२०११, कार्यालय दूरध्वनी क्र. ०२२–६२४९१११११,०२२–६२४९१११

(राखी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी